ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २० जून, १९५१ अंक २५

## विविध माहिती

**संस्कृत वाचनालयाला देणगी**—नेपाळच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी नेपाळच्या सरसेनापतींनीं १० लाख रुपयांची देणगी दिली आहे. ह्या देणगींत २०,००० पुस्तकांचा एक संग्रह आणि १०० जुने हस्तलिखित ग्रंथ आहेत. हस्तलिखित ग्रंथांपैकीं कांहीं १,००० वर्षांपूर्वी लिहिलेले आहेत. नेपाळ सांस्कृतिक परिषदेला वरील देणगी देण्यांत आली आहे.

**रोख रक्कम हलविण्याच्या वेळीं संरक्षण**—बँकांतील रोख रक्कम रिझर्व्ह बँकेंत भरणा करण्याच्या वेळीं सशस्त्र संरक्षण देण्याच्या एका योजनेचा मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. ह्या विषयाचा विचार करण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें बँकांच्या प्रतिनिधींची एक बैठक मुंबईत भरविली होती. नोटा व नाणीं रिझर्व्ह बँकेंत भरण्यासाठी नेलीं जात असतां रिझर्व्ह बँकेनेंच संरक्षणाची व्यवस्था करावी अशी सूचना बैठकींत करण्यांत आली असतां ती एकमतानें मंजूर करण्यांत आली.

**उसाच्या ६०० जाती**—कोइमतूर येथील ऊंस-संशोधन-केंद्रांत उसाच्या निरनिराळ्या ६०० जाती निर्माण करण्यांत आल्या आहेत असें समजतें. ह्या भागांतील मूळच्या उसापासून साखरेचा उतारा ८·५ टक्के येवढाच होतो. परंतु नवीन तयार करण्यांत आलेल्या जातीपासून साखरेचा उतारा १० टक्के पर्यंत वाढला आहे.

**हैदराबादमधील कागदाचें उत्पादन**—हैदराबाद संस्थानमधील एका कागदाच्या गिरणीचें उत्पादन गेल्या ६ महिन्यांत २० टक्क्यांनीं वाढलें आहे. ह्या गिरणीचें वार्षिक उत्पादन ४५,००० टन होईल असा अंदाज आहे. गिरणींत कागदाच्या उत्पादनाची वाढ करण्यासाठी आणखी यंत्रें बसविण्यांत येत आहेत. नवीन यंत्रसामुग्री काम करूं लागल्यावर रोज २५ टन वृत्तपत्राचा अगर साधा कागद अधिक निघूं लागेल.

**इंडिअन सायन्स कॉंग्रेस**—ह्या संस्थेचें वार्षिक अधिवेशन जानेवारी, १९५२ मध्यें कलकत्ता येथें भरण्याचें निश्चित झालें आहे. पूर्वीच्या अधिवेशनाप्रमाणें ह्याहि अधिवेशनाला बरेच परदेशीय शास्त्रज्ञ हजर रहाणार आहेत असें समजतें.

**टागोरांच्या हस्तलिखितांची भेट**—सुप्रसिद्ध भारतीय कवि व तत्त्वज्ञानी रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या ग्रंथांच्या दोन हस्तलिखित प्रती अमेरिकेंतील मॅकगिल विद्यापीठाला, त्यांच्या मुलातर्फे देण्यांत आल्या भारताचे अमेरिकेंतील हाय-कमिशनर ह्यांनीं वरील प्रती गेल्या २१ तारखेला विद्यापीठाच्या हवालीं केल्या.

**भारतीय रेल्वेजसाठी साहित्य**—१९५२-५३ सालीं भारतीय रेल्वेजसाठी ४२ कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. इतकी रक्कम खर्च करून २२७ एंजिनें, ८,००० माल वाहू डबे आणि १,४०० उतारूंचे डबे बांधण्यांत येतील. उतारूंच्या डब्यांच्या संख्येंत करण्यांत येणारी वाढ नेहमींपेक्षां दुप्पट आहे. खालच्या वर्गाच्या उतारूंच्या डब्यांत अलीकडे फार गर्दी होते म्हणून ह्या प्रकारच्या डब्यांत अधिक वाढ करण्यांत येत आहे.

**खेळण्यांचा पुरवठा**—भारतांतील मुलांना निरनिराळ्या प्रकारचीं खेळणीं पुरविण्याचें काम १४ देश करतात. ह्या देशांत पूर्वी जपानचा नंबर पहिला असे. परंतु आतां जपानची जागा ब्रिटननें घेतली आहे. गेल्या वर्षी ब्रिटननें भारतला ९,८६,००० रुपयांचीं खेळणीं पुरविलीं. चेकोस्लोव्हाकिआनें ४१,००० रुपयांचीं, जपाननें, २२,००० रुपयांचीं आणि अमेरिकेनें २८,००० रुपयांचीं खेळणीं पाठविलीं. भारतांतील खेळणीं तयार करण्याचा धंदा अपुरें भांडवल व कच्च्या मालाचा तुटवडा ह्या कारणांमुळें अद्याप बाल्यावस्थेंतच आहे.

**भारत व रशिआ ह्यांचा व्यापार**—भारतानें रशिआला १९४८ सालीं ३७९ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात केला. १९४९ व १९५० सालांची निर्यात अनुक्रमें ३८१ लाख व १४१ लाख रुपये किंमतीच्या मालाची झाली. चहा, मसाल्याचे पदार्थ, तंबाखु, लाख, एरंडेल तेल व ताग ह्या मालाची निर्यात करण्यांत आली. रशिआकडून भारतानें १७० लाख रुपये किंमतीचा माल १९५० सालीं आयात केला.

**मोटारींचें उत्पादन बंद करण्यांत येणार**—अमेरिकेंतील जनरल मोटार्स कॉर्पोरेशननें जुलै २८ ते ऑगस्ट ६ पर्यंत मोटारी तयार करण्याचें बंद करण्याचें ठरविलें आहे. ता. १ जुलैपासून अमेरिकेच्या संरक्षण खात्यानें कांहीं विशिष्ट वस्तूंच्या वापरावर निर्बंध घालण्याचें जाहीर केलें आहे. त्यामुळें मोटारींच्या कारखान्यांना पुरेसा कच्चा माल मिळणें कठीण होणार आहे पुढें मोठ्या प्रमाणावर बेकारी माजूं नये म्हणून जनरल मोटार्सनें वरील निर्णय घेतला आहे.

**रेड क्रॉसची देणगी**—भारतामधील दुष्काळग्रस्त भागांतील मुलांसाठी अमेरिकन रेड क्रॉस सोसायटीनें २,००,००० डॉलर्सची मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेंतून मुलांना तयार अन्न, दुधाची भुकटी, अन्नसत्वाच्या गोळ्या इत्यादि वस्तू पुरविण्यांत येणार आहेत. ह्या मदतीपैकीं निम्मी मदत अमेरिकन मुलांनीं भारतामधील मुलांच्यासाठी वर्गणी करून गोळा केली आहे.

**ब्रिटनमध्यें पेट्रोलचें वांटप**—आंतरराष्ट्रीय परिस्थिति बिघडून पेट्रोलची टंचाई भासूं लागल्यास त्याचें वांटप करण्यासाठीं नवीन कुपन्स छापण्याचें काम ब्रिटनमध्यें सुरू झालें आहे. १९५० मध्यें ब्रिटनमधील पेट्रोलचें वांटप बंद करण्यांत आलें. वांटप चालू असतां दर महिना १०० मैल जाण्याइतकें पेट्रोल मिळत असे.

**कापडावरील निर्यात-जकात वाढली**—भारतामधून निर्यात होणाऱ्या मध्यम प्रतीच्या व जाड्या कापडावरील जकात किंमतीवर १० टक्के घेण्यांत येत होती. ता. १ जून, १९५१ पासून ती २५ टक्के करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें तलम आणि अतितलम कापडावर बर पौंडामागें घेण्यांत येणारी २ आण्यांची जकातीवरील सूट रद्द करण्यांत आली आहे.

**सिंद्री येथील खताचा कारखाना**—१९५१ च्या नोव्हेंबरमध्यें सिंद्री येथील खताचा कारखाना उत्पादनास सुरुवात करील. ह्या कारखान्यासाठी आतांपर्यंत १८.४ कोटी रुपये खर्च झाले असून आणखी ४६ कोटी रुपये खर्च व्हावयाचे आहेत. पहिल्या १२ महिन्यांत सुमारें १,७५,००० टन अमोनियम सल्फेट तयार होईल सध्याच्या बाजारभावाप्रमाणें त्याची किंमत ५४ कोटी रुपये आहे.

**मुंबईत पावाचा मोठा कारखाना**—मुंबईमध्यें पाव तयार करण्याचा एक मोठा कारखाना लवकरच निघणार आहे. कारखान्यांत रोज ३० टन गव्हाचे पाव तयार करतां येतील. एकूण ३० लाख रुपये भांडवल जमविण्यांत येणार आहे असें समजतें. भांडवल बेकरीवाल्यांकडूनच घेण्यांत येईल. सध्यां मुंबईत रोज ५०,००० पाव तयार होतात. नवीन कारखान्यांत तयार होणारा पाव अधिक स्वच्छ पद्धतीनें व स्वस्त तयार होईल.

**२२ तास चाललेली पार्लमेंटची बैठक**—ब्रिटिश पार्लमेंटच्या कॉमन्स सभेंत नवीन अंदाजपत्रकांतील बसविण्यांत आलेल्या करावर चर्चा चालू होती. ती फारच लांबल्यामुळें एका प्रसंगीं पार्लमेंटला २२ तास, ३ मिनिटें एकसारखें काम करावें लागलें. ह्यापूर्वी १८८१ मध्यें एका प्रसंगीं कॉमन्स सभागृहाची बैठक ४१½ तास चालली होती. १९३६ मध्यें बेकारीवर चर्चा चालली असताची बैठक ३६ तास चालली होती.

**एअर इंडिया इंटरनॅशनल**—ह्या कंपनीच्या स्थापनेला ता. ८ जूनला तीन वर्षे पूर्ण झालीं. प्रथम कंपनीचीं विमानें आठवड्यांतून एकदांच लंडनला जात असत. अलीकडे आठवड्यांत चारदा लंडनचा प्रवास करण्यांत येऊं लागला आहे. कंपनीच्या मालकीचीं 'कान्स्टेलेशन' जातीचीं चार विमानें आहेत. प्रत्येक विमानांत ५७ उतारू बसण्याची सोय आहे. १९५० मध्यें कंपनीनें १२,२६७ उतारूंची ने-आण केली.

**तांब्याच्या तुटवड्याचें संकट**—तांब्याच्या ताराच्या तुटवड्यामुळें भारताच्या विजेच्या पुरवठ्याच्या योजना अंमलांत आणणें कठीण होऊं लागलें आहे, असें समजतें. तारें उत्पन्न करणाऱ्या देशांनीं, विशेषतः अमेरिकेनें, तें साठविण्याचें ठरविल्यामुळें भारतामधील तांब्याच्या तारेचे दोन मोठे कारखाने बंद पडण्याचीं भीति उत्पन्न झाली आहे. ह्यापैकीं एक कारखाना कलकत्त्याला आणि एक जमशेटपूरला आहे. तांब्याच्या तुटवड्यामुळें तांब्याच्या वस्तूंच्या किंमती वाढल्या आहेत आणि त्यांच्या चोऱ्याही वाढल्या आहेत. बंगाल सरकारला गेल्या वर्षी १४,८०० रुपयांचें नुकसान चोऱ्यांपायीं सोसावें लागलें.


## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्ययावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर






# अर्थ

बुधवार, ता. १० जून, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआच्या आर्थिक योजनांची पार्श्वभूमि

सोव्हिएट रशिआची अर्थव्यवस्था योजनाबद्ध असते हें आतां बहुतेकांना माहीत आहे. किंबहुना असेंही म्हटलें तरी चालेल कीं अर्थव्यवस्थेच्या बुद्धिपुरस्सर योजनेची कल्पना रशियन क्रांतीनंतरच पसरूं लागली. दुसऱ्या महायुद्धानंतर रशिआनें जो पहिला पंचवार्षिक कार्यक्रम आंखला होता, तो पुरा झाल्याचें नुकतेंच अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. परंतु अजून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची घोषणा करण्यांत आलेली नाहीं. त्यामुळें कित्येकांना असें वाटण्याचा संभव आहे कीं नियोजनाची मूळ कल्पनाच रशिआनें सोडून दिली असावी. मागचा इतिहास पाहिला तर ही समजूत चुकीची असावी असें वाटतें.

सो. रशिआचा पहिला पंचवार्षिक कार्यक्रम १९२८–२९ ते १९३२–३३ ह्या कालखंडावर पसरलेला होता. ह्या कार्यक्रमाची अधिकृत घोषणा १९२९ च्या एप्रिल महिन्यांत झाली. परंतु प्रत्यक्ष कामाला सुरवात आधीच झालेली होती. हा कार्यक्रम कागदोपत्रीं ५ वर्षांचा असला तरी तो ४ वर्षांतच म्हणजे १९३२ सालींच पूर्ण करण्यांत आला. त्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची घोषणा १९३४ च्या जानेवारींत म्हणजे सुमारें एक वर्ष उशिरा करण्यांत आली. ह्या विलंबाचीं कारणें देतांना 'इकॉनॉमिस्ट' पत्रानें आंतरराष्ट्रीय परिस्थिति आणि उत्पादनाची वाढ दाखविण्याची इच्छा अशीं दोन कारणें सांगितलीं आहेत. दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम ४। वर्षांत संपविण्यांत आला. १९३७ सालीं तो पुरा करण्यांत आला तरी पण तिसऱ्या कार्यक्रमाची घोषणा १९३९ च्या मार्च महिन्यांत करण्यांत आली. तिसऱ्या कार्यक्रमांत अवजड उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्यांत आलेलें होतें. शस्त्रास्त्रांच्या निर्मितींत आणि वहातुकींच्या साधनांच्या उत्पादनांत अवजड उद्योगधंद्यांचें स्थान अत्यंत महत्त्वाचें असतें. १९३९ च्या आसपास आंतरराष्ट्रीय परिस्थिति धोक्याची झालेली होती. रशिआवर जपानकडून आणि जर्मनीकडून एकदम हल्ला होण्याचा संभव होता. अशा परिस्थितींत अवजड उद्योगधंद्यांवर देण्यांत आलेला जोर मुद्दामच जाहीर करण्यांत आला असावा. कारण त्यामुळें संभाव्य शत्रू हल्ला करण्यापूर्वीं विचार करतील असा संभव होता. सो. रशिआच्या पंचवार्षिक कार्यक्रमांविषयीं जी माहिती सरकारीरीत्या प्रसिद्ध करण्यांत येते तिचा इतिहासहि उद्बोधक आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं तीन मोठाले ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आले होते. रशिआचा अर्थशास्त्रीय भूगोल, कच्च्या मालचें उत्पादन व वसविण्यांत येणारीं नवीन औद्योगिक केंद्रें ह्याविषयीं तपशीलवार आंकडे देण्यांत आले होते. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं इतकी माहिती देण्यांत आली नाहीं. तिसऱ्या कार्यक्रमासंबंधीची आंकडेवार माहिती तर प्रसिद्धच करण्यांत आली नाहीं. इतकेंच नव्हे, तर मूलभूत उद्योगधंद्यांनीं पांच वर्षांत जास्तींत जास्त किती उत्पादन करावयाचें त्याचे आंकडेहि प्रसिद्ध करण्यांत आले नाहींत.

सोव्हिएट रशिआच्या आर्थिक कार्यक्रमांचा विचार करतांना, तेथील राज्यकर्ते आंतरराष्ट्रीय परिस्थिति लक्षांत घेतात असें दिसतें. १९२८ ते ३२ च्या कार्यक्रमाची तपशीलवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली त्याचें एक कारण असें असण्याचा संभव आहे कीं हाच काळ जागतिक, आर्थिक अरिष्टांचा असल्यामुळें लष्करी आक्रमणाचा धोका रशिअन राज्यकर्त्यांना वाटला नसावा. परंतु नंतर जर्मनींत हिटलरची राजवट आली व हा धोका वाढला. आजहि ॲंग्लो-अमेरिकन राष्ट्रांचा गट आणि सो. रशिआंकित राष्ट्रांचा गट ह्यांच्यांत 'थंडें युद्ध' चालू आहे. तेव्हां युद्धोत्तर दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा तपशील जाहीर होणें कठीणच वाटतें. तथापि विद्युत्पादनाचीं नवीन केंद्रें काढणें, कालवे खणणें आणि जंगलांची वाढ करणें ह्या औद्योगिक योजना चालू झाल्या आहेत. ह्या त्रुटित भासणाऱ्या योजनांचा समन्वय करून युद्धोत्तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची घोषणा करण्यांत येण्याचा संभव दिसतो. ती केव्हां करण्यांत येते, हा प्रश्न स्वतंत्र आहे.

---

## १९५०–५१ मधील वस्तूंचे बाजारभाव

१९५०–५१ हें वर्ष वाढत जाणाऱ्या बाजारभावांविषयीं प्रसिद्ध समजलें जाईल. कारण, जूननंतर कोरियन प्रकरणामुळें बाजारभाव वाढत चालले. सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतीचा निर्देशांक १९३९ ऑगस्टचे भाव आधारभूत म्हणजे १०० धरून १९४९–५० सालीं ३८५·४ होता तो १९५०–५१ च्या वर्षीं ४०९·७ झाला. एप्रिलमधील हा आंकडा ३९१·३ होता तो सप्टेंबरमध्यें ४१२·५ झाला. किरकोळ वस्तूंचे बाजारभाव १९५०–५१ या वर्षीं तंबाखू, कौलें, विटा व मसाल्याचे पदार्थ यांच्या किंमतींत विशेष वाढ झाल्यामुळें, प्रामुख्यानें वाढले. १९४९–५० चा किरकोळ वस्तूंचा किंमतीचा निर्देशांक ५७०·७ होता तो १९५०–५१ वर्षीं ७०७·४ झाला. एकट्या तंबाखूच्या भावांत ७६२ पासून ११५८ पर्यंत वाढ झाली. औद्योगिक कच्च्या मालाच्या किमतींत सामान्यपणें १०·९टक्के वाढ १९५०-५१ या वर्षीं दिसून आली. कापूस, ताग व लोकर या वस्तूंच्या किंमतींत विशेष वाढ झाली. कातड्यांच्या किंमतींत २१ टक्के, वनस्पती तेलाच्या बाबतींत ९ टक्के, धातूंच्या बाबतींत ५ टक्के व इतर अर्धवट कारखानी मालाच्या बाबतींत २१टक्के वाढ १९५०-५१ या वर्षीं झाली. पक्क्या मालाच्या बाबतींत कापडाच्या किंमतीचा निर्देशांक १९४९–५० मध्यें ४०२ होता तो १९५०-५१ मध्यें ४०९ झाला; रेशीम व रेयॉन यांचा ४९८ होता तो ६४६ झाला व लोकरीच्या कापडाचा २८१ होता तो ३१३ झाला. याप्रमाणें १९५०–५१ या वर्षीं सर्वसाधारण किंमतींत वाढ झाली हें खरें असलें तरी विशेषतः मार्चपासून तीन महिने निरनिराळ्या वस्तूंच्या किंमतींत विशेष वाढ होत आहे हें मेच्या सुरवातीला निर्देशांक ४५५ होता यावरून दिसून येतें.

---

## दि ओगले ग्लास वर्क्स लि.

### उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

वरील कंपनीनें ३१ डिसेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी २५,९१,२३९ रुपयांची विक्री केली आणि ४,२४,६५७ रु. अव्वल नफा मिळविला. त्यांतून १,६४,४७७ रु. घसारा काढून व्यवस्था खर्च वजा केल्यावर ५५,४९८ रु. तोटा उरला. गेल्या वर्षातील शिलकी नफा हिशेबांत घेतल्यावर ताळेबंदांत येणें बाजूस ५२,१७२ रु. तोटा दिसत आहे. १९४९ सालीं कंपनीस पूर्वीच्या वर्षांपेक्षां कमी नफा (५५,७४२ रु.) झाला होता, ह्याचें कारण कंपनी तयार करीत असलेल्या मालाच्या किंमती अपेक्षेपेक्षां उतरल्या, हें होय. तें वर्ष कंपनीस कठीण गेलें, तरी १९५० हें वर्ष चांगलें जाईल अशी अपेक्षा होती. परंतु १९५० पासून परिस्थिति झपाट्यानें बदलली. इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलनें अवार्ड देऊन जानेवारी, १९५० पासूनची मजुरी वाढल्या दरानें देवविली. त्यामुळें एकट्या मजुरी खातींच १,००,००० रु. पेक्षां अधिक मोठा बोजा कंपनीस सहन करावा लागला. अवार्डवर संतुष्ट न होऊन कामगार जुलै, १९५० मध्यें एक महिना संपावर गेले, ह्या मुदतींत काचकाम तयार झालें नाहीं तरी ग्लास मेल्टिंग फरनेस चालू ठेवावी लागून सुमारें १,००,००० रु. नुकसान झालें. मॅनेजिंग एजंट उत्पादनवाढीचा कसून प्रयत्न करीत आहेत; १९५१ च्या पहिल्या तिमाहींतील काम आखलेल्या योजनेप्रमाणें झालें आहे. तेव्हां, १९५१ चा अहवाल निराशाजनक होणार नाहीं, अशी अपेक्षा आहे.

## दि साठे बिस्किट्स अँड चॉकोलेट कं. लि.

### गेल्या वर्षातील उत्कृष्ट कामगिरी

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५१ अखेर संपलेल्या दुसऱ्या वर्षी २३,६५,८२० रु. ची चॉकोलेट व बिस्किटें ह्यांची विक्री केली. ५०,००० रु. घसाऱ्याची तरतूद करून आणि गुडविल, प्राथमिक खर्च आणि शेअर कमिशन ह्यांचे २२,९९१ रु. लिहून टाकून १,३९,४०५ रु. नफा मिळविला. म्हणजे, प्राथमिक खर्च व ब्रोकरेज ह्या खातीं ताळेबंदांत कांहींहि रक्कम राहिलेली नाहीं. प्रॉव्हिडंट फंड ५ हजार रु., वेलफेअर फंड ५ हजार रु., मशिनरी रिझर्व्ह फंड ४० हजार रु., टॅक्सेशन रिझर्व्ह फंड ४० हजार रु., अशी वाटणी करून रि. क्यु. प्रे. शेअर्सवर ५% व ऑर्डिनरी शेअर्सवर ५% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी अनुक्रमें ८,५७५ रु. व ३९,५२० रु. चा विनियोग सुचविण्यांत आला आहे. विक्रीस काढलेले १५ लक्ष रुपयांचे सर्व ऑर्डिनरी भाग खपले आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. पूर्वी मागविलेल्या सर्व यंत्रसामुग्रीची उभारणी झाली आहे. आणखी कांहीं मशिनरीची ऑर्डर देण्यांत आली आहे. कामगारांच्यासाठीं कांहीं घरें बांधून झालीं आहेत आणि आणखी घरें चालू वर्षी बांधण्यांत येतील. वरील वृत्तांतावरून कंपनीच्या उत्कृष्ट प्रगतीची कल्पना येईल. श्री. ग. रा. साठे ह्यांनीं प्रारंभापासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीस तोंड देऊन बिस्किटाच्या धंद्यांत भारतांतील कारखान्यांत उच्च स्थान मिळविलें आहे, ही महाराष्ट्रास अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. (मॅ. एजंट्स: साठे फूड इंडस्ट्रीज लि. वार्षिक सभा: २९–६–१९५१)

### पटवर्धनस (जमखंडी) लि., जमखंडी

वरील खासगी कंपनी नोंदण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल, १०,००,००० रु. आहे. इलेक्ट्रिक एंजीनिअर्स व कॉन्ट्रॅक्टर्स हा तिचा व्यवसाय राहील. लेडी लीलावती देवी पटवर्धन ह्यांचें पहिले डायरेक्टरचे जागीं नांव आहे.

## कलकत्ता नॅशनल बँकेची ठेवी-बंदी

### हुकूम रद्द करण्याची हायकोर्टाकडे मागणी

"पश्चिम बंगालमधील कांहीं बँका गेल्या वर्षअखेर रिझर्व्ह बँकेच्या सूचनेस अनुसरून एकत्रित झाल्या, त्यावेळीं कलकत्ता नॅशनल बँकेनें एकत्रीकरणास विरोध केला होता. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना हें आवडलें नाहीं. ११ मे रोजीं रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी चीफ ऑफिसर, मि. सुब्बय्या, ह्यांनीं एक हुकूम काढून कलकत्ता नॅशनल बँकेस नव्या ठेवी स्वीकारण्याची बंदी केली. जीं कारणें त्यासाठीं दाखविण्यांत आलीं, तीं खरीं नव्हतीं. बँकेनें मोरेटोरियमचा अर्ज दिला, तो हायकोर्टानें मान्य करून २० जूनपर्यंत बँकेस ठेवींच्या परतफेडीची तहकुबी दिली. रिझर्व्ह बँकेचा मूळ हुकूमच बेकायदा आहे. म्हणून ठेवी घेण्याची बंदी करणारा रिझर्व्ह बँकेचा हुकूम रद्द ठरविण्यांत यावा." वरील मागणी करणारा अर्ज श्री. ताराचरण चतर्जी, कलकत्ता बँकेचे एक डायरेक्टर, ह्यांनीं कलकत्ता हायकोर्टाकडे केला आहे. "रिझर्व्ह बँकेचा हुकूम रद्द कां करण्यांत येऊं नये, ह्याचीं कारणें दाखवा" असा हुकूम हायकोर्टानें रिझर्व्ह बँकेस केला असून २३ जून रोजीं रिझर्व्ह बँकेनें आपलें उत्तर द्यावयाचें आहे.

### भारताला अमेरिकेची मदत: कर्जाच्या अटी

प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं १५ जून रोजीं, 'दि इंडियन इमर्जन्सी फूड एड ॲक्ट ऑफ १९५१' बिलावर सही केली. ह्या कायद्यान्वयें, भारताला अमेरिकेंत धान्य-खरेदीसाठीं १९ कोटी डॉलर्स कर्जाऊ मिळणार आहेत. कर्जाच्या करारावर भारतातर्फे श्री. विजयालक्ष्मी व एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेतर्फे तिचे चेअरमन मि. हर्बर्ट गेटसन ह्यांनीं सह्या केल्या. भारतानें ३५ वर्षांत कर्जफेड करावयाची आहे व २½% दरानें व्याज द्यावयाचें आहे. पहिलीं पांच वर्षे मुद्दलाची व पहिलें एक वर्ष व्याजाची फेड सुरू होणार नाहीं.

### श्री. सोनाळकरांचा परदेशचा दौरा

युनायटेड कमर्शिअल बँक लि. च्या पुणें शाखेचे एजंट म्हणून काम करीत असलेले श्री. चिंतामण राजाराम सोनाळकर हे इंग्लंड, इटली, स्वित्झर्लंड, इत्यादि देशांतील बँकिंगचा पहाणी करण्यासाठीं १ जून रोजीं परदेशीं रवाना झाले.


# THE SATHE BISCUIT AND CHOCOLATE Co. Ltd.

820, Bhavani Peth, Poona 2.

# NOTICE

NOTICE is hereby given that the Second Annual General Meeting of the share-holders of the above-named Company will be held on Friday the 29th June 1951, at the Registered Office of the Company (820 Bhavani Peth, Poona 2) at 5-0 p. m. (S. T.) to transact the business already circulated to the shareholders.

By the order of the Board,
For Sathe Food Industries, Ltd.
G. R. Sathe,
Chairman.
Managing Agents.

Poona 2.
13th June 1951.

## डेक्कन बँक्स असोसिएशनचें कार्य

अध्यक्ष, श्री. धों. कृ. साठे, ह्यांनीं घेतलेला आढावा.

डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें, या संस्थेस मुंबई राज्याचे अर्थमंत्री नामदार वैकुंठराय मेहता यांनीं शनिवार दि. २ जून, १९५१ रोजीं सकाळीं १० वाजतां भेट दिली, त्या प्रसंगीं असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. धों. कृ. साठे यांनीं केलेलें भाषण:—

"सध्याच्या प्रगतीच्या काळांत अर्थव्यवस्थेंत व समाजोपयोगी साधन म्हणून बँकांना फार महत्वाचें स्थान आहे. मुंबई इलाख्यांत तसेंच या प्रांतांतील दक्षिणेकडील भागांत, संयुक्त भांडवली बँकांची प्रगती बरीच झाली असून त्या आपआपल्या कार्यक्षेत्रांत उपयुक्त असें कार्य करीत आहेत. या बँकांच्या पैकीं कांहीं बँका शेड्युल्ड बँका म्हणूनहि काम करीत आहेत. दक्षिण भागांतील स्थानिक बँकांखेरीज, अन्यत्र स्थापन झालेल्या बँकांच्या शाखाहि येथें काम करीत आहेत. पुण्यामध्यें मागील बँकांच्या आपत्तीनंतर, प्रथमच स्थापन झालेली व महाराष्ट्रास मान्य असलेली अशी बँक ऑफ महाराष्ट्र सन १९३५ मध्यें स्थापन झाली. तिचे पहिले अध्यक्ष सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै. प्रो. वा. गो. काळे हे होते. त्यानंतर पुढें कालांतरानें प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक, भारत इंडस्ट्रियल बँक, बँक ऑफ पूना, पूना इनव्हेस्टर्स बँक व डेक्कन इंडस्ट्रियल इनव्हेस्टर्स बँक ह्या संस्था अस्तित्वांत आल्या. संस्थानें विलीन होण्यापूर्वी भोर संस्थानमध्यें स्थापन झालेली भोर स्टेट बँक ही ह्या जिल्ह्यांतीलच आहे. अशा या स्थानिक बँका एकत्र येऊन बँकिंग व्यवहारासंबंधीं सर्वसाधारण अडचणींचा विचार तसेंच जनतेमध्यें बँकिंगची संवय मोठ्या प्रमाणांत वाढून देशाच्या अर्थ-व्यवस्थेमध्यें त्याचा उपयोग व्हावा, या उद्देशानें संघ अगर असोसिएशन असावी असा विचार बँकांच्या चालकांचे मनांत बरेच दिवस घोळत होता व त्या दृष्टीनें पुणें येथील बँकांचे स्थानिक चालक बरेच दिवस एकत्र येऊन विचार-विनिमय करीत असत. या कल्पनेस मूर्त स्वरूप देऊन व योग्य अशी घटना तयार होऊन त्याद्वारा संघटनेचें कार्य करावें अशा हेतूनें पुणें येथें एक प्राथमिक सभा दि. १७ नोव्हेंबर, १९४९ रोजीं भरली व डेक्कन बँक्स असोसिएशन या नांवाची संस्था स्थापावी असें ठरलें. संस्थेचें कार्यक्षेत्र पुणें शहरापुरतें न ठेवतां आपल्या प्रांतांतील दक्षिण भागापर्यंत विस्तृत करावें असें ठरवून घटना तयार करण्याकरितां एक समिती नेमली व समितीच्या अहवालाप्रमाणें घटनेचा मसुदा तयार करून तो सभासद होऊं इच्छिणाऱ्या बँकांकडे पाठवून त्यांनीं सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करून अखेरची घटना दि. २८ जून, १९५० रोजीं भरलेल्या सभेंत मंजूर करण्यांत आली व संस्था त्या दिवशीं स्थापन झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

"असोसिएशनच्या उद्देशामध्यें, सभासद-बँकांचें हितसंरक्षण त्या कार्याखेरीज बँकांसंबंधीं होणाऱ्या कायद्यासंबंधीं मत प्रदर्शन करणें याबरोबरच बँकिंगची वाढ योग्य पायावर करण्याची खटपट करणें, तसेंच बँकिंग व्यवहारासंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करून ती सभासद-बँकांस पुरविणें, तसेंच बँकिंगच्या कायद्यासंबंधीं व व्यवहारासंबंधीं शिक्षण देणें व बँका-बँकांचे संबंध चांगले ठेवण्याचा प्रयत्न करणें असें आहे. ग्रामीण विभागांत जनतेमध्यें बँकिंगची आवड उत्पन्न करून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास वाव आहे. मुंबई सरकार व मध्यवर्ती सरकार बँकांना संपूर्ण साहाय्य करील तर असोसिएशनच्या सभासद-बँका

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा : ३, ५, १० वर्षें सिल्व्हर
१ दादर ज्युबिली सर्टिफिकीटें
२ माहीम दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें.
३ बेळगांव हेड ऑफिस-गिरगांव मुंबई
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

जरूर तो पुढाकार घेऊन ग्रामीण विभागांतील जनतेंत बँकिंगची आवड उत्पन्न करण्याचे कामीं सहकार्य व मदत जरूर करतील असें मला वाटतें. या ठिकाणीं एक उल्लेख करणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें व तो म्हणजे असा कीं, मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांचीं संघटना अशाच उद्देशानें आजचे आपले सन्माननीय पाहुणे ना. वैकुंठलाल मेहता यांनीं पुढाकार घेऊन केलेली आहे व तेंच उद्देश व तें ध्येय आम्हीं डोळ्यापुढें ठेऊन कार्य करीत आहोंत.

"या असोसिएशनचें पुण्याबाहेरील युनियन बँक ऑफ विजापूर, सोलापूर, बुधगांव बँक, रत्नाकर बँक सांगली, कराड बँक वगैरे बँका या संस्थेच्या सभासद असून सभासद उत्तरोत्तर वाढत आहेत, व चालकांची अशी खात्री आहे कीं लवकरच असोसिएशनच्या कार्यक्षेत्रांतील सर्व बँका सभासद होऊन असोसिएशनच्या कार्यांत सहकार्य करतील. असोसिएशननें आतापर्यंत केलेल्या कार्यांत मुख्य कार्य असें केलें आहे कीं नवीन बँकिंग कायद्याप्रमाणें निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा विचार करून त्याबाबत रिझर्व्ह बँकेकडे वेळोवेळीं पत्रव्यवहार करून त्यासंबंधीं समाधानकारक असे निर्णय मिळविले आहेत. तसेंच बँकिंग व्यवहारासंबंधीं मुंबई सरकारचे जे कायदे आहेत, त्यासंबंधींहि मुंबई सरकारकडे पत्रव्यवहार करून त्याबाबतहि योग्य अशी तजवीज करण्याचे कामीं असोसिएशनला यश आलें आहे. आपणां सर्वांना माहीत असेल कीं मुंबई सरकारनें सावकारी नियंत्रण कायद्याखालीं शेड्युल्ड बँकांबरोबरच इतर बँकांनाहि वगळलें आहे व या कामीं असोसिएशननें पुढाकार घेऊन मुंबई सरकारास कायद्यामध्यें योग्य दुरुस्ती करण्याची विनंति केली होती. या कामीं आपले आजचे सन्माननीय पाहुणे यांनीं सहानुभूतीचें धोरण स्वीकारल्यानें कायद्यांत योग्य ती दुरुस्ती झाली व त्याबद्दल त्यांचे या ठिकाणीं मनःपूर्वक आभार मानणें हें आपलें कर्तव्यच आहे.

"मुंबई सरकार ज्या ज्या वेळीं आर्थिक प्रश्नासंबंधीं विचार करतें व बाहेरील अर्थशास्त्रज्ञांच्या सहायाची अपेक्षा करतें, त्या त्या वेळीं मुंबई सरकारनें आमच्या असोसिएशनचाहि अभिप्राय घ्यावा, अशी विनंती आहे."

### प्रा. धनंजयराव गाडगीळ भारताच्या मार्गावर

प्रा. गाडगीळ हे विलायतेंतील आपलें काम संपवून भारताकडे परत येण्यासाठी दि. ७ जून रोजीं निघाले असून ते २२-२३ जूनचे सुमारास येथें पोंचतील, असें समजतें.

**बाँबे प्रॉ. को. मार्केटिंग सोसायटी लि. ला इंपोर्ट लायसेन्स**

वरील सोसायटीला ३४,६५,००० रुपये किंमतीचें ११,००० टन सल्फेट ऑफ अमोनिया आयात करण्याचा लायसेन्स मिळाला आहे. १६,००,००० रुपयांचीं डीझेल ऑईल इंजनें आणण्याचा इंपोर्ट लायसेन्सहि सोसायटीनें मिळविला आहे. आणखी लायसेन्स मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

## रुपयाची किंमत वाढविणें आवश्यक आहे काय ?

( भा. म. काळे )

सप्टेंबर, १९४९ मध्यें सुलभ चलनाच्या निरनिराळया २४ देशांनीं आपल्या चलनाचें परराष्ट्रीय देवघेवीसाठीं अवमूल्यन केलें. या घटनेला, आज दीड वर्षाहून जास्त दिवस होऊन गेले. हिंदनेंहि त्याचवेळीं रुपयाचें अवमूल्यन केलें व त्यामुळें हिंदच्या परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळून १९५० सालीं आपला परराष्ट्रीय व्यापार अनुकूल तफावत दाखविणारा झाला. अवमूल्यनाचा हा एक प्रकारें विजय होय, कारण १९४६ ते ४९ या तीन वर्षांत परराष्ट्रीय व्यापारांत सतत प्रतिकूल तफावत येत होती. ती परिस्थिति आतां बदलली आहे. परंतु सप्टेंबर, १९४९ मध्यें रुपयाची किंमत ३०.५ टक्क्यांनीं उतरविण्यांत आली, त्या बाबतींत हिंदनें अलिकडच्या परिस्थितीच्या दृष्टीनें कांहीं फेरविचार करणें आवश्यक आहे किंवा काय याचा विचार करणें जरूर आहे.

अवमूल्यनाचा मुख्य संबंध परराष्ट्रीय व्यापाराशीं येतो, व गेल्या एक वर्षांत या बाबतींतील परिस्थिति पुढीलप्रमाणें बदलली आहे. कोरियन युद्धामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीमुळें अमेरिका वगैरे राष्ट्रांनीं युद्धविषयक तयारीच्या दृष्टीनें साठेबाजीला सुरवात केली आहे. याचा परिणाम हिंदला अनुकूल असा झाला आहे. कारण, आपल्या सर्व प्रकारच्या कच्च्या मालाला वाढत्या प्रमाणांत मागणी येत आहे व मालाचे बाजारभावहि वाढत जात आहेत. तेव्हां, आपल्या निर्गत व्यापाराला तेजी आहे. यानंतर विचार करण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे इंग्लंड सारख्या देशालाहि पौंडाची किंमत वाढवावी कीं काय असें वाटूं लागलें आहे व यामुळें पौंडाची किंमत कांहीं प्रमाणांत वाढविणें योग्य आहे अशा तऱ्हेची भाषा अलिकडे इंग्लंडमध्यें ऐकूं येत आहे. तिसरी गोष्ट म्हणजे हिंद, इ. देशांनीं आपल्या चलनाचें अवमूल्यन केलें परंतु पाकिस्ताननें आपल्या रुपयाचें अवमूल्यन केलें नाहीं. त्या वेळीं असा एक विचार व्यक्त केला जात होता कीं, परिस्थितीच्या दडपणामुळें पाकिस्तानला आपल्या रुपयाचें अवमूल्यन करावेंच लागेल. परंतु तसें कांहीं न होतां नुकताच हिंदनें पाकिस्तानशीं तात्पुरता व्यापारी करार केला आहे व पाकिस्तानच्या १०० रुपयाबरोबर हिंदचे १४४ रुपये हा भाव मान्य केला आहे. आंतरराष्ट्रीय चलन निधीनेंहि, बऱ्याच उशिरां, पाकिस्तानच्या रुपयाच्या दराला मान्यता दिली आहे. या दोनही गोष्टी आजची परिस्थिति बदलली आहे हें स्पष्टपणें दर्शवितात. या बाबतींत आणखी चवथी गोष्ट ही कीं, स्टर्लिंग गटाची डॉलर शिल्लक गेल्या वर्षापासून वाढत चालली आहे, व आंतरराष्ट्रीय व्यापारांत डॉलर देश विरुद्ध सुलभ चलनाचे देश या दोन गटांतील डॉलर-देशांचें वर्चस्व बरेंचसें कमी होऊं लागलें आहे. या बाबतींत आणखी एक निदर्शक गोष्ट म्हणजे अमेरिकेचा सोन्याचा सांठा अलिकडे कमी होत चालला असून अमेरिकेकडून सोनें परदेशाकडे जात आहे. ऑस्ट्रेलियाहि आपल्या चलनाची किंमत वाढविण्याच्या विचारांत आहे.

येथें दिलेल्या माहितिवरून असें स्पष्ट दिसतें कीं, विशेषतः जून, १९५० पासून आंतरराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति बदलत चालली असून ती सुलभ चलनाच्या देशांच्या दृष्टीनें सुधारत चालली आहे. हल्लींच्या काळांत परराष्ट्रीय व्यापार अनेक नाजूक घटनां वर अवलंबून असतो. या दृष्टीनें सुलभ चलनाच्या देशांना अनुकूल परिस्थिति प्राप्त होत असेल तर तिचा जास्तींत जास्त फायदा या देशांनीं करून घेतला पाहिजे. तेव्हां, हिंदनें आपल्याच रुपयाची किंमत कांहीं प्रमाणांत वाढविणें योग्य ठरेल असें वाटतें.

हिंदनें आपल्या रुपयाची किंमत कांहीं प्रमाणांत वाढविल्यास त्यामुळें हिंदनें आपली आर्थिक कार्यक्षमता जगाला दाखविल्यासारखें होणार आहे. चहा, मँगनीज, अभ्रक, ताग, इ. हिंदचा विक्री माल अशा स्वरूपाचा आहे कीं जागतिक बाजारपेठेंत त्याला नेहमींच मागणी असते व ही मागणी टिकाऊ स्वरूपाची आहे. यामुळें रुपयाची किंमत वाढवून जागतिक व्यापारांतील आपली मजबुती हिंदनें व्यक्त करण्याची ही योग्य वेळ आहे असें वाटतें.

हिंदला परदेशांतून धान्य, यंत्रसामुग्री इ. माल आयात करावा लागतो. या दृष्टीनेंहि, आपल्या रुपयाची किंमत वाढविल्यास त्यामुळें परकी मालाबद्दल कमी किंमत द्यावी लागेल हा हिंदचा विशेष फायदा आहे. याहि दृष्टीनें रुपयाची किंमत वाढविणें आज योग्यच ठरेल.

चलनाची परराष्ट्रीय देवघेवीसाठीं किंमत वारंवार बदलणें चांगलें नव्हे असें म्हणतात व तें बरोबर आहे. परंतु १९४९ सालीं अवमूल्यन करावें लागलें तें अपरिहार्य म्हणून. आतां लौकरच त्यावेळीं स्वीकारलेलें धोरण पुन्हां सुधारणें शक्य असल्यास त्यांत अयोग्य कांहींच नाहीं. ही संधि लौकर हातीं आली आहे, ही गोष्ट केव्हांहि चांगलीच. मात्र एकदां यावेळीं रुपयाची किंमत वाढविल्यानंतर ती कायम राखली गेली पाहिजे. यासाठीं आपलें उत्पादन व आपला विक्री–माल यांचा दर्जा कायम राखण्याकडे व सुधारण्याकडेहि दृष्टि पाहिजे. आंतरराष्ट्रीय परिस्थिति जास्त शांततेची बनली म्हणजे हिंदच्या विक्री मालाला मागणी कमी प्रमाणांत येईल. कदाचित् चहाच्या बाबतींत इतर देशांच्या स्पर्धेला तोंड द्यावें लागेल. तागाची मागणीहि आजच्या प्रमाणें राहील असें नाहीं. अमेरिका, इ. देशांनीं तागाऐवजीं इतर माल वापरणें व पाकिस्ताननें आपला तागाचा धंदा वाढविणें याहि गोष्टी शक्य आहेत. हिंदच्या कापडाला आज आशियांतील देशांत मागणी आहे. तीहि टिकून राहील असें नाहीं. तेव्हां रुपयाची किंमत वाढविली तरी या दूरच्या गोष्टींकडेहि हिंदच्या कारखानदारांना बारकाईनें लक्ष द्यावें लागेल.

---


## कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ति २ री, किं. ४ रु. कूळ कायदा, १९३९ आवृत्ति ३ री, किं. ३ रु. हिमार्यादितिबंधक कायदा आवृत्ति ३ री, किं. १ रु. हिंदु पोटस्फोट कायदा आजतागायतच्या दुरुस्त्यांसह व कानूंसह किं. १ रु., भाडेनियंत्रण कायदा किं. २ रु., मुंबई सावकारी कायदा आजतागायत किं. २॥ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं. २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा अद्ययावत् किं. ४॥ रु., संदपावत्या पुस्तक किं. १० आणे.

**Law Academy Bulletin Monthly : contains New & Amendment Acts, Rules, orders, etc. Annual subscription Re. one.**

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें.

### शेती कंपन्यांच्या डिव्हिडंडवर प्राप्ती कर माफ आहे.

शेती कंपन्यांनीं जाहीर केलेलें डिव्हिडंड भागीदारांस मिळालें तरी त्याचें शेतीविषयक स्वरूप नाहींसें होत नाहीं आणि त्या डिव्हिडंडवर इन्कमटॅक्स माफ असतो, असा इन्कमटॅक्स अपेलेट ट्रायब्यूनल ( कलकत्ता शाखा ) चा ताजा निवाडा आहे. असें डिव्हिडंड शेतीचें उत्पन्न नव्हे, असें सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूनें ३५–३ सर्क्युलरमध्यें जाहीर केलें होतें. त्याचे विरुद्ध प्रस्तुत निवाडा झाला आहे. कलकत्ता येथील डंकन ब्रदर्स अँड कं. लि. ही चहाच्या कांहीं कंपन्यांची शेअर होल्डर आहे. त्या कंपन्यां-कडून मिळालेलें डिव्हिडंडचें सर्व उत्पन्न इनकम टॅक्स अधिकाऱ्यानें करास पात्र ठरविलें, त्यावरील अपीलानें इनकम टॅक्स अधिकाऱ्याचें म्हणणेंच पक्कें केलें. परंतु ट्रायब्यूनलचा निवाडा मात्र आतां भागीदाराच्या बाजूचा झाला आहे. एकाद्या उत्पन्नाचें वैशिष्ट्य, तें उत्पन्न कंपनीकडून भागीदाराच्या पदरांत पडल्यामुळें बदलूं शकत नाहीं, असा ह्या निवाड्याचा अर्थ आहे.

### जंगल कामगारांच्या सहकारी संस्था

१९४७ च्या बॉम्बे को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् रूलसमध्यें केलेल्या नव्या दुरुस्तीनुसार जंगल–कामगारांच्या सहकारी संस्थांना ऑक्टोबर ते सप्टेंबर असे हिशेबाचे वार्षिक तक्ते ठेवावे लागतील. सदरहू दुरुस्ती मुंबई सरकारच्या ता. ३१ मेच्या गॅझिटच्या भाग ४ बमध्यें प्रसिद्ध झाली असून तीनुसार अशा सहकारी संस्थांनीं आपल्या वार्षिक हिशेबाचे तक्ते दरसाल ३१ ऑक्टोबरपूर्वी प्रसिद्ध केले पाहिजेत. या तक्त्यांची एक प्रत रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् यांनीं नेमलेल्या ऑडिटरांकडे १५ नोव्हेंबरपूर्वी पाठविली पाहिजे.

१९५०–५१ सालीं मात्र हिशेबाचे तक्ते १ जुलै १९५० ते ३० सप्टेंबर १९५१ पर्यंतचे असतील.

### चित्रपटधंद्याच्या मंदीस प्रारंभः पगारांत कपात

अमेरिकन चित्रपट–कंपन्यांचें उत्पन्न घटत चाललें असल्यामुळें, त्यांनीं खर्चास कात्री लावण्यास प्रारंभ केला आहे. ट्वेंटिएथ सेंचरी–फॉक्स कंपनीच्या १३० वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं खुषीनें आपल्या पगारांत कपात पत्करली आहे. ही कपात १ जुलै १९५१ पासून अडीच वर्षें चालू राहील. दर आठवड्यास ५०० ते १००० डॉलर पगार असणारांचा पगार २५% कमी होईल; साप्ताहिक २,००० डॉलरांवर पगार असणारांना ५०% कपात सोसावी लागेल. त्यामुळें २५,००,००० डॉलर्सची बचत होईल. त्याचा मोबदला म्हणून फॉक्स कंपनीच्या नफ्यापैकीं निम्मा नफा हा १३० अधिकाऱ्यांना योग्य प्रमाणांत वाटून मिळेल चित्रपटधंद्याच्या मंदीच्या प्रारंभाची ही कपात निदर्शक आहे.

### रिटा हेवर्थच्या काडीमोडाचें राष्ट्रीय महत्त्व

रिटा हेवर्थला प्रिन्स अलिखानकडून तिच्या मागणीप्रमाणें मुलीच्या नांवानें ३० लक्ष डॉलर्सचा ट्रस्ट करून मिळाला, तर तिचा स्वतःचा अर्थ साधेलच परंतु त्याबरोबर तिच्या देशाचें हितहि साधेल. कारण काडीमोड करून परदेशांतून एवढ्या द्रव्याची आयात अमेरिकेंत अद्याप कोणीहि केलेली नाहीं. रिटा हेवर्थनें आपलें आकर्षण व मोहकपणा विकून अमेरिकेच्या तिजोरींत ३० लक्ष डॉलर्सची भर घातली, असा हिशेब होईल.

### रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर श्री. एम. जी. मेहेंद्री हे निवृत्त होत आहेत. त्यांच्या जागीं श्री. रामनाथ ह्यांची नेमणूक झाली आहे. श्री. रामनाथ हे पूर्वी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर होते.

हिंद फायनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड.
इंडियन कंपनीच्या कायद्याखालीं नोंदलेली. | नोंदलेलें संक्षिप्त नांव : हिंदफिन
धनवटे चेंबर्स, सीताबर्डी, नागपूर १.
विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,०००
रु. ५० च्या दर्शनी किंमतीच्या १०,००० हिश्श्यांत विभागलेलें.
मुख्य उद्देश:—उद्योगधंदे व इतर कार्यासाठीं योग्य व्याजाच्या दरांनीं आर्थिक मदत देणें. तसेंच सोनें, चांदी व इतर मौल्यवान धातू व जवाहीर ह्यांचे दागदागिने तयार करणें, विकणें, व गहाण ठेवून घेणें. घरें बांधण्यासाठीं अथवा खरेदी करण्यासाठीं लांब मुदतीचीं कर्जें देणें, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट बांधून अथवा भाड्यानें घेऊन, लोकांच्या मौल्यवान वस्तू ठेवून घेणें. लहान प्रमाणावर चालवतां येण्यासारखे धंदे स्थापन करणें, वगैरे वगैरे.
अध्यक्ष:—श्रीमंत पूर्णचंद्रराव गोपाळराव बुटी.
श्री. गो. आ. भोंसुले, बी. कॉम्., सेवानिवृत्त मॅनेजर, सी. पी. अँण्ड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
श्री. गो. रा. ओती, एम्. ए.
भोंसुले ओती कं. मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार
हिस्सेदारांच्या ठेवी अत्यंत आकर्षक दरानें घेतल्या जातात.
गरजू हिस्सेदारांना तारण घेऊन सोईवार अटींवर कर्ज दिलें जाईल.
कंपनीचे हिस्से लवकर खरेदी करून कंपनीकडून मिळणारे अनेक फायदे मिळवा. अर्जाचे फॉर्म व त्रोटक माहितीपत्रक मागवून घ्या. हिस्से विक्रीसाठीं सन्मान्य, अनुभवी व वजनदार एजंट पाहिजेत.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२९१, बुधवार पेठ
हमदरे बोळाजवळ,
पुणें २.

( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

## —मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज. अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.

के. डी. शिराळकर मॅनेजर

दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहूपुरी—कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई—फोर्ट—(१०) मुंबई—मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केलें जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवीवर व्याज—

चालू खातें अर्धा टका, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षे ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.

मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

## १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.